क्र. का.६/सीआर २०४८/परिपत्रक/२२८३-२६४
नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य,
पुणे यांचे कार्यालय, पुणे - १
दिनांक १४.१०.९८.

**परिपत्रक :-**

**विषय :- महालेखापाल यांनी काढलेल्या स्थानिक तपासणी अहवालामधील मान्य केलेल्या परिच्छेदातील वसुलीबाबत..**

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, महालेखापाल यांनी काढलेल्या स्थानिक तपासणी अहवालामधील मान्य परिच्छेदातील वसुली सदर परिच्छेद/ मान्य केल्याचे तारखेपासून अनेक वर्षे होवून गेली तरीही होत नाही. तसेच दुय्यम निबंधक/ सह जिल्हा निबंधक यांची बदली झाल्यावर नवीन ठिकाणचा कार्यभार स्विकारल्यानंतर त्या कार्यालयातील पूर्वीच्या स्थानिक तपासणी अहवालातील जी वसुली होण्याची बाकी असेल त्या बाबत बहुतेक वेळा, काहीही दखल घेतली जात नाही. परिणामतः जुनी वसुली शिल्लक रहाते व प्रकरणे गुंतागुंतीची होतात. तरी सर्व वसुली बाबत सतत पाठपुरावा करुन प्रयत्नशील रहावे, मुंबई मुद्रांक अधिनियम व नोंदणी अधिनियमान्वये कृती करुन वेळोवेळी अहवाल या कार्यालयास द्यावा.

सही/xxxxx

(पां. ध. महाले)
उप नोंदणी महानिरीक्षक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत :-

१. सह जिल्हा निबंधक (दुय्यम निबंधकांच्या जादा प्रतींसह)
२. दुय्यम निबंधक मुंबई, व सह दुय्यम निबंधक बांद्रा यांस.
३. सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे, यांस अग्रेषित.